कालमर्यादित

क्र/यजिप/साप्रवि/पंचायत/आस्था-१/ 848 /२०१९
यवतमाळ जिल्हा परिषद, यवतमाळ
( पंचायत विभाग )
यवतमाळ दिनांकः- 16 / 5 /२०१९

प्रति,

गट विकास अधिकारी,
पंचायत समिती-----------------सर्व.

**विषयः-** पंचायत विभागा अंतर्गत वर्ग ३ च्या नियतकालनीन विनंती बदलीबाबतची तात्पुरती वास्तव्य सेवा ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने पंचायत विभागा अंतर्गत कार्यरत वि.अ.पं/ ग्राविअ/ ग्रा.से. यांची सन २०१९ या वर्षाचे विनंती बदलीबाबतची तात्पुरती वास्तव्य सेवा कालावधीची ज्येष्ठता यादी ईमेल व्दारे आपले कार्यालयास पाठविण्यात येत आहे. त्याच प्रमाणे सदर यादी जिल्हा परिषद यवतमाळ च्या संकेतस्थळ (zpyavatmal.gov) वर प्रसिध्द करण्यात येत आहे.तसेच सदर यादी जिल्हा परिषदेच्या नोटिस बोर्ड वर प्रसिध्द करण्यात येत आहे.

आपले पंचायत समिती अंतर्गत अधिनस्त सर्व विस्तार अधिकारी (पं), ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक यांना सदर यादी पुरवुन त्यांच्या निदर्शनास आणुन देण्यात यावी. सदर यादीवर आक्षेप किंवा त्रुटी असल्यास कर्मचा-यांचे लेखी स्वरुपात आक्षेप प्राप्त करुन एकत्रित आक्षेप पुराव्यासह दिनांक20/५/२०१९ रोजी पर्यंत सायंकाळी ५.४५ पर्यंत सादर करावे. विहित मुदतीच्या आत प्राप्त न झालेले आक्षेप विचारात घेतले जाणर नाही याबाबत नोंद घ्यावी.

बदली करतांना सदर माहिती मध्ये तफावत असल्यास किंवा चुकिची असल्यास अथवा चुकिची बदली झाल्यास संबंधित सहा. प्रशासन अधिकारी , कनिष्ठ प्रशासन अधिकारी व संबंधित लिपीका विरुद्ध प्रशासकिय कार्यवाही करण्यात येईल याची त्यांना जाणीव करुन देण्यात यावी.

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं)**
**जिल्हा परिषद यवतमाळ**

**प्रतिलीपी :-**

१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांना माहितीस्तव सविनय सादर.

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं)**
**जिल्हा परिषद यवतमाळ**